शिवस्मारकाचे बांधकाम करणाऱ्या कंपनीला नियमानुसारच मुदतवाढ

■ मुंबई

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या बांधकामावरून आज विधान परिषदेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलाच वाद रंगला शिवसंग्रामचे आमदार विनायक मेटे यांनी आरोप केला की स्मारकाचे बांधकाम करणाऱ्या एल अँड टी कंपनीला मुदतवाढ देण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने परस्पर घेतला त्यावर उत्तर देताना हि मुदतवाढ रीतसर आणि नियमांना धरून असल्याचा खुलास सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी केला आहे.

विनायक मेटे यांनी आज विधान परिषदेत एका लक्षवेदीद्वारे हा मुद्दा उपस्थित करताना ही मुदतवाढ पूर्णपणे बेकायदेशीर आहे, असा आरोप केला होता. त्यावर खुलासा करताना अशोक चव्हाण यांनी सांगितले की, ही मुदतवाढ देण्यासाठी मी स्वतः ९ ते १० वेळा बैठका घेतल्या. ९ जुलै २०२१ रोजी एक वर्षाची मुदत्वाद या प्रकरणात देण्यात आली होती. कारण मुदतवाढ न दिल्यास नव्याने कंपनी निवडण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे नव्याने प्रक्रिया राबवल्यास ती वेळखाऊ ठरली असती. एल अँड टी कंपनीला या स्मारकाच्या बांधकामासाठी २०१८ ते २०२१ असा ३६ महिन्यांचा

अशोक चव्हाण यांचा खुलासा

कालावधी देण्यात आला होता. परंतु न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्याने तसेच काही परवानग्या शिल्लक असल्याने हे काम रखडले असे स्पष्टीकरण चव्हाण यांनी दिले आहे. तसेच वर्क ऑर्डरचा कालावधी कमी करता येईल का? यासाठीही प्रयत्न असतील असेही चव्हाण यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण उच्च न्यायालयात वर्ग केले आहे. मच्छिमार समाजाची जनहित याचिका, जैवविविधता याचिका जनसुनावणी न घेणे आणि कॅगचे ताशेरे यामुळे स्मारकाचे काम रखडले असेही त्यांनी सांगितले.

सिद्धगडावरील बलिदान दिनाचे कार्यक्रम रद्द

■ मुरबाड, प्रतिनीधी

१ व २ जानेवारी रोजी हुतात्मा स्वातंत्र्यवीर भाई कोतवाल व हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनीनिमित्त देशप्रेमी मानवंदना कार्यक्रम साजरे करण्यासाठी सिद्धगड येथे येतात मात्र कोरोनाच्या नवा ऑमिक्रोम प्रकारामुळे मर्यादित उपस्थितीत हा बलिदान दिन साजरा केला जाणार आहे. त्यामुळे यंदा कुठल्याही प्रकारचे सार्वजनिक कार्यक्रम होणारे नसल्याचे सिद्धगड स्मारक समितीच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

दरवर्षी स्वातंत्र्य सैनिकांचे नातेवाईक, ठाणे रायगड जिल्ह्यातील मुख्याध्यापक, विद्यार्थी, महिला, कुस्ती, स्पर्धक, पैलवान, सर्व देशप्रेमी येतात, मात्र यावर्षी १व २ जानेवारी २०२२ रोजी कुठल्याही प्रकारचे सार्वजनिक कार्यक्रम सिद्धगड होणारं नसल्यानें कुणीही सार्वजनिक कार्यक्रमासाठी येऊ नये, असे आवाहन स्मारक समितीने केले आहे.

भारतीय बँकांमध्ये अनेक खाती निष्क्रिय असतात. दहा वर्षे ही खाती अशीच निष्क्रिय राहिली की मग बँका या खात्यातील ठेवींचे पैसे भारतीय रिझर्व्ह बँकच्या 'ठेवीदार जनजागृती निधी' (DE-F) योजनेत हस्तांतरित करतात. ' ३१ मार्च २०२१ पर्यंत, असे ३१,६४०.०५ कोटी रुपये बँकांकडून रिझर्व्ह बँककडे हस्तांतरित केले गेले अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी अलीकडेच लोकसभेत दिली. मात्र रिझर्व्ह बँकेच्या २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अहवालात नमूद केलेला आकडा मात्र मंत्र्यांनी दिलेल्या आकड्याशी जुळणारा नव्हता. बँकेने हे पैसे ३९,२६४ कोटी रुपये असल्याचे वार्षिक अहवालात म्हटले आहे. दोन आकड्यांमधील ही तफावत ७,६२४ कोटी रुपये इतकी आहे. त्यामुळेच ही रक्कम कुठे गायब झाली? याची चर्चा होत आहे.

'ठेवीदार जनजागृती निधी' आणि गायब झालेल्या ७,६२४ कोटींचे रहस्य...

२०२०-२१ च्या आर्थिक वर्षात 'ठेवीदार जनजागृती निधी' साठीच्या 'मास मीडिया' मोहिमांवर १६४.९० कोटी खर्च करण्यात आले अशी माहिती लोकसभेला देण्यात आली. डॉ. कराड यांच्या म्हणण्यानुसार, २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये, 'ठेवीदार जनजागृती निधी' ने ठेवीदारांचे शिक्षण आणि जागरूकता आयोजित

करण्यासाठी नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना फक्त २.२८ कोटी रुपये दिले आहेत.' 'ठेवीदार जनजागृती निधी'चा उपयोग ठेवीदारांच्या हितसंबंधांच्या संवर्धनासाठी आणि रिझर्व्ह बँकेने नमूद केल्याप्रमाणे ठेवीदारांच्या हितसंवर्धनासाठी आवश्यक असलेल्या इतर कारणांसाठी केला जातो,' असे डॉ. कराड म्हणाले.

काँग्रेस खासदार डी.के सुरेश यांनी 'ठेवीदार जनजागृती निधी'मध्ये एकूण जमा झालेली रक्कम आणि या निधीच्या माध्यमातून वापरण्यात आलेली रक्कम याविषयी लोकसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. कराड म्हणाले, २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये 'ठेवीदार जनजागृती निधी'तील ८७४.८७ कोटी रुपये खर्च करण्यात आले. यापैकी रु.७०७.६७ कोटी हे व्याज देणार्या ठेवींवरील व्याजाचे होते, तर रु.१६४.९० प्रसिद्धी मोहिमेवर खर्च करण्यात आले होते. ज्या ग्राहकाची ठेव 'ठेवीदार जनजागृती निधी'कडे हस्तांतरित केली गेली आहे अशा ग्राहकाकडून त्याच्या पैशांची मागणी झाल्यास, बँकांना त्या ग्राहकाला व्याजासह त्याच्या पैशांची परतफेड करावी लागते आणि 'ठेवीदार जनजागृती निधी' कडून हे पैसे परत बँकेला मिळण्यासंबंधी दावा दाखल करावा लागतो असे कराड म्हणाले.

केंद्रीय राज्यमंत्र्यांनी लोकसभेत सांगितलेला आकडा आणि रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालातील आकडा यांच्यातील ७,६२४ कोटींच्या विसंगतीबद्दल वित्तीय सेवा विभागाने खुलासा केला आहे. त्यांनी म्हटले आहे की,'या प्रकरणी रिझर्व्ह बँकेशी सल्लामसलत करण्यात आली होती. रिझर्व्ह बँकेने या संदर्भात पुढील गोष्टी स्पष्ट केल्या आहेत. रिझर्व्ह बँकेकडे असलेली 'ठेवीदार जनजागृती निधी'तील एकूण शिल्लक आणि 'ठेवीदार जनजागृती निधी'त दावा न केलेल्या हस्तांतरित ठेवींची एकूण शिल्लक या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. 'ठेवीदार जनजागृती निधी'त दावा न केलेल्या हस्तांतरित ठेवींची एकूण शिल्लक ही 'ठेवीदार जनजागृती निधी'तील एकूण शिल्लकीचा एक भाग आहे. म्हणूनच रिझर्व्ह बँकेच्या ताळेबंदात असलेली ३९,२६४.२५ कोटींची रक्कम ही हस्तांतरित ठेवींचे ३१,६४०.०४ कोटी व २०२०-२१ या आर्थिक वर्षातील व्याज-धारक ठेवींवरील देय व्याज व इतर बाबींसाठी लागणारे ७,६२४ कोटी अशी एकत्रित रक्कम आहे.



पुण्यात इंजिनियरिंग कॉलेजमध्ये १३ विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह

■ पुणे

देशात कोरोनाचा धोका दिवसागणित वाढत असतानां, राज्यात गेल्या १० दिवसात कोरोना रुग्णांमध्ये मोठ्य संख्येनं वाढ झाली आहे. दुसरीकडे नुकत्याच ऑफलाइन सुरू करण्यात आलेल्या शाळा आणि कॉलेजमध्ये कोरोनानं शिरकाव करायला सुरुवात केली आहे. आधी नवी मुंबईतील शाळा त्यापाठोपाठ आता नगरमध्ये ५२ मुलांना कोरोनाची लागण झाली आहे. नगर नंतर आता पुण्यातही विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह आल्याने खळबळ उडाली आहे. पुण्यातील एमआयटी या शैक्षणिक संस्थेमध्ये कोरोनाचा शिरकाव केला आहे. कोरोनाबाधित झालेल्याच्या संपर्कात २५ जण आले होते. त्या सर्वांची कोरोना चाचणी करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार १३ विद्यार्थ्यांचा रिपोर्ट कोरोना पॉझिटिव्ह आले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांनी कोरोनाच्या दोन्ही लसीचे डोस घेतले होते. तर ८ विद्यार्थ्यांची कोरोना चाचणी निगेटिव्ह आली आहे. कोथरूड येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमधील मॅकेनिकल इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे. या सगळ्यामुळे येत्या काळात ऑफलाईन वर्ग आणि परीक्षांबाबत कोरोना विषयक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी लागणार आहे.

मुंबई-आग्रा महामार्गावर भाजपचे ठिय्या आंदोलन

नाशिक- मुंबई-आग्रा महामार्गावर शेतकरी वीजप्रश्नी, पीक नुकसान भरपाई आणि शेतकर्यांच्या विविध प्रश्नावर आमदार डॉक्टर राहुल आहेर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह दोन तास ठिय्या आंदोलन केले. त्यामुळे महामार्गावरील दुतर्फा वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची कुठलीही मदत शेतकऱ्यांना मिळाली नाही आणि सरकार केवळ वसूली करण्यात मग्न असून शेतकर्यांना वार्यावर सोडले आहे. तरी या सरकारला जाग आणण्यासाठी आज मुंबई-आग्रा महामार्गावरील चांदवड पेट्रोल चौफुली येथे भाजपच्या कार्यकर्त्यांकडून आंदोलन करण्यात आले. आंदोलनावेळी महामार्गावरील दुतर्फा वाहनांची रिंग लागली. त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागले. तरी शेतकरी आमच्या मागण्या मान्य जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत आम्ही या ठिकाणावरून हलणार नाही, असा ठामपणे निर्णय आंदोलकांनी घेऊन आपला ठिय्या दोन तास सुरू ठेवला होता. शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न मार्गी लागला नाही तर आम्ही पुन्हा आंदोलन यापेक्षा जास्त तीव्र स्वरूपाची करू, अशा इशारा राहुल आहेर यांनी दिला.

चिपळूण बचाव समितीची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घडवणार

रत्नागिरी, प्रतिनिधी- लोकप्रतिनिधी म्हणून आपण कायम चिपळूणकरांसोबत आहोत. त्यांनी तुम्ही विनंती करायची नाही तर हक्काने सांगायचे, तो तुमचा अधिकार आहे. चिपळूणला वाचविण्यासाठी जे-जे करावे लागेल, ते-ते सर्व करण्याची माझी तयारी असल्याचे आश्वासन रत्नागिरी सिंधुदुर्गचे खासदार विनायक राऊत यांनी

खा. विनायक राऊतांचे आश्वासन

दिले. अधिवेशन सुरू असल्यामुळे आपल्याला चिपळूणला येता आले नाही, मात्र आपले लक्ष चिपळूणवासियांकडे होते. उपमुख्यमंत्री अजित पवार रत्नागिरी-सिंधुदुर्गचे दौऱ्यावर होते. त्यांच्याशी आपले बोलणे झाले आहे. त्यांनीही १९ कोटी रुपये देण्याचे मान्य केले आहे.

धुळ्यात आझाद समाज पक्षाचे चक्काजाम

■ धुळे

वाढत्या महागाईविरोधात आझाद समाज पक्षाच्या कार्यकर्त्यांनी धुळे शहरात चक्काजाम आंदोलन करण्यात आले. दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तूंची किंमत वाढल्यामुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाला आहे. त्यामुळे केंद्र सरकारचा विरोध करत असल्याचे आझाद समाज पक्षाचे महासचिव आनंद लोंढे यांनी सांगितले. आनंद लोंढे म्हणाले की, सर्व सामान्य माणसाचा आक्रोश मोदी सरकारपर्यंत पोचावा म्हणून रस्त्यावर उतरून केंद्र सरकारचा जाहीर विरोध करणे हाच आता एकमेव पर्याय निर्माण झाला आहे. त्यामुळे संपूर्ण देश महागाईने होरपळून निघत आहे. हातमजूर, शासकीय कर्मचारी असो की हातावर कमावणारा सामान्य नागरिक हे सर्व आज केंद्र सरकारवर मोठ्या प्रमाणात नाराज झाले आहे. त्यामुळे सध्या हा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे, त्यातच दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तूंची देखील किंमत वाढल्यामुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाला आहे. त्यामुळे केंद्र सरकारचा विरोध करत आज आझाद समाज पक्षाचे महासचिव आनंद लोंढे यांनी केंद्र सरकारच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

महागाई विरोधात आक्रमक

आरोग्य सुविधा देण्यात नंबर १ वर केरळ तर महाराष्ट्र पाचव्या स्थानावर

नवी दिल्ली- देशात आरोग्य सेवा देण्यात केरळ राज्य अव्वल ठरले असून, महाराष्ट्र पाचव्या स्थानावर असल्याचे हेल्थ कार्ड नीती आयोगाकडून जारी करण्यात आले आहे. त्यानुसार आयोगाने जारी केलेल्या हेल्थ इंडेक्समध्ये दक्षिणेकडील राज्यांनी बाजी मारली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नीती आयोगाने जारी केलेल्या हेल्थ इंडेक्समध्ये केरळ पहिल्या, तामिळननाडू दुसऱ्या, तेलंगना तिसऱ्या, आंध्रप्रदेश चौथ्या, महाराष्ट्र पाचव्या आणि गुजरात सहाव्या स्थानी आहे. या इंडेक्समध्ये राजस्थान १६व्या, मध्यप्रदेश १७व्या, बिहार १८व्या आणि उत्तर प्रदेश १९व्या स्थानी आहे. नीती आयोगाने दिलेल्या माहितीनुसार हेल्थ इंडेक्ससाठी चार राऊंडमध्ये सर्व्हे करण्यात आला. त्यानंतर स्कोअरिंग करण्यात आली. या चारही राऊंडमध्ये केरळच टॉपला राहिला. केरळचा ओव्हरऑल स्कोअर ८२.२० होता. तर दुसऱ्या नंबरवरील तामिळनाडूचा स्कोअर ७२. ४२ इतका होता. तर उत्तर प्रदेशचा स्कोअर सर्वात कमी होता. उत्तर प्रदेशचा स्कोअर ३०. ५७ एवढा होता. तर उत्तम आणि दर्जेदार सेवा देण्यात छोट्या राज्यांमध्ये मिझोराम पहिल्या स्थानावर आहे. या यादीत त्रिपुरा दुसऱ्या क्रमांकावर असून नागालँड शेवटच्या स्थानावर आहे. तर केंद्र शासित प्रदशांमध्ये दादरा नगर हवेली पहिल्या, चंदीगड दुसऱ्या आणि दिल्ली पाचव्या स्थानावर आहे. दरम्यान, या सर्व्हेत कोरोना काळात राज्यांनी दिलेल्या आरोग्य सुविधांचाही आढावा घेण्यात आल्याचं सांगितलं जाते.

माजगावात मुलाचा बाथरूममध्ये पाण्याच्या टाकीत पडून मृत्यू

■ सिंधुदुर्ग, प्रतिनिधी

सावंतवाडीतील माजगावच्या उद्यमनगर येथे दीड वर्षीय विघ्नेश नाईकाचा बाथरुम मधील पाण्याच्या टाकीत पडुन मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये एकच हळहळ व्यक्त होत आहे.

विघ्नेश हा सकाळी घरातील व्यक्तींची नजर चुकवून बाथरूममध्ये गेला होता. मात्र त्याठिकाणी असलेल्या पिंपात तो बुडलेल्या स्थितीत आढळून आला. विघ्नेशचे वडील सकाळी कामानिमित्त बाजारपेठेत गेले होते. तर आई आपल्या कामात व्यस्त होती. यावेळी घरातल्यांची नजर चुकवून खेळण्यासाठी विघ्नेश बाथरूममध्ये केला. दरम्यान तो तोल जाऊन पाण्याच्या पिंपात कोसळला. मात्र कोणाचा लक्ष न गेल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. हा प्रकार उशिरा निदर्शनास आल्यानंतर त्याच्या वडिलांनी सावंतवाडी पोलिसात खबर दिली. त्यानुसार पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मराठवाडा विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे मुंडन आंदोलन

नांदेड- महाराष्ट्र राज्य विद्यापीठ आणि महाविद्यालय सेवक संयुक्त समितीच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये आज विविध मागण्यांसाठी मुंडन आंदोलन करण्यात आले. यामध्ये महिलावर्ग आणि कर्मचारी उपस्थित होते. या आंदोलनात १० कर्मचाऱ्यांनी मुंडण केले.

सातवे वेतन आयोग लागू करण्यात यावे आणि जुनी थकबाकी आम्हाला मिळाली पाहिजे, अशा विविध मागण्यासाठी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी आक्रमक झाले आहेत. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आम्ही हे आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

SBI
भारतीय स्टेट बँक
कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

सूचना

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्सफर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली - ११००५५ (इमेल आयडी: sbi.igr@alankit.com) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

अनु क्र.	फोलियो क्र.	धारकाचे नाव	समभाग संख्या	प्रमाणपत्र क्रमांक पासून	प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत	विभिन्न क्रमांक पासून	विभिन्न क्रमांक पर्यंत
१	०७५०७५८१	मधु सूदन	२४०	६३०७६४३	६३०७६४३	८०५९५३४३३३	८०५९५३४५७२
२	०२११३०६१	सुनिता पुट्टू	५००	७७२६८७	७७२६८७	७४३३२७०९३१	७४३३२७१४३०
३	०७५१३०८२	ओम प्रकाश रस्तोगी दया राणी रस्तोगी	१४०	६३१३१२९	६३१३१२९	८०६०६६७१५८	८०६०६६७२९७
४	०७५१३०८१	दया राणी रस्तोगी ओम प्रकाश रस्तोगी	१४०	६३१३१२८	६३१३१२८	८०६०६६७०१८	८०६०६६७१५७
५	००७८१०१५	सिद्ध प्रताप मौर्य कांचन मौर्य	३०	५५२६६	५५२६६	७३८६६०२५३१	७३८६६०२५६०
६	०३१३७५०१	महेश मल्होत्रा	१२००	२१४२८९	२१४२८९	७४५४६२८४३१	७४५४६२९६३०
७	०७५२८३१९	डी मानक चंद	२८०	६३२८३१९	६३२८३१९	८०६५०८९०५७	८०६५०८९३३६
८	०७४१५४०४	जॉन के व्ही रेबेकाइप अजित जॉन	११०	६२१५८०६	६२१५८०६	८०१३९५६७४३	८०१३९५६८५२
९	०७१०७३०८	चंद्रन ई	४००	२३००५७	२३००५७	७४६०९०३६७१	७४६०९०४०७०
१०	०३२०९७३०	कल्पना मुखर्जी मास्टर शमिंद्र नाथ मुखर्जी	५३०	२१६२८६	२१६२८७	७४५५५७०९१	७४५५५७५६२०
११	०२३४०४८४	कृष्णवती	६००	१९१२८३	१९१२८३	७४४२८४४१२१	७४४२८४४७२०
१२	०७५१५२९६	रामदेव सिंह	१४०	६३१५३३९	६३१५३३९	८०६११७३४३२	८०६११७३५७१

वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.

स्थळ: मुंबई
दिनांक: २८.१२.२०२१

समभागांची संख्या: ४३१०
स.प्रमाणपत्रांची संख्या: १३

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)

विधानभवनावर आत्मदहन करण्यासाठी निघालेल्या शिक्षकांना पोलिसांनी रोखले

मुंबई- जुनी पेन्शन योजन लागू करण्याच्या मागणीसाठी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मुंबईच्या आझाद मैदानात आंदोलन सुरु केले असून जुनी पेन्शन संघर्ष समितीने दिलेल्या आंदोलनाच्या हाकेला प्रतिसाद देऊन शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आझाद मैदानात हजर झाले आहेत. हे शिक्षक आज आक्रमक झाले आणि त्यांनी विधानभवनावर आत्मदहन करण्यासाठी मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यावेळी तेथे तैनात असलेल्या पोलिसांनी आंदोलक शिक्षकांना रोखल्याने एकच गोंधळ उडाला. राज्य सरकारने जुनी पेन्शन योजना बंद केली असून नवीन पेन्शन योजना लागू केली आहे, ही नवीन योजना फसवी असल्याचा आरोप आंदोलक शिक्षकांनी केला आहे. या विरोधात राज्यभरातील कर्मचारी ठिकठिकाणी आंदोलन करत आहे.